LIC
भारतीय आयुर्विमा महामंडळ
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

# भारतीय जीवन बीमा निगम

पेन्शन व समूह योजना विभाग,नाशिक विभागीय कार्यालय, नाशिक.
'जीवन प्रकाश' पी.अ‍ॅन्ड जी.एस. विभाग, गोल्फ क्लब ग्राऊंड, गडकरी चौक, नाशिक-२.
फोन नं.२५७३५२०,२५८१९६२फॅक्स : २५७८०६७ E-mail : bo.g708@licindia.com

प्रति,
अध्यक्ष / व्यवस्थापक

______________________

______________________

______________________

## ग्रॅच्युईटीसह समूह विमा योजना :

## (मालकांकरिता आमर्षक व कर्मचाऱ्यांच्या हिताची)

## (Group Gratuity Cash Accumulation with life Insurance)

सेवा समाप्तीनंतर नोकरदारास एकत्रित प्राप्त होणारी रक्कम म्हणजे ग्रॅच्युईटी होय. कुठल्याही कर्मचारी/कामगारांस सेवा समाप्तीनंतर भविष्य निर्वाह निधीतील जमा रक्कम, पेन्शन याबरोबरच ग्रॅच्युईटीची रक्कमही मिळते. त्यामुळे " ग्रॅच्युईटी " कर्मचारी/कामगारांसाठी ग्रॅच्युईटी अत्यंत जिव्हाळ्याचा विषय ठरतो.

" ग्रॅच्युईटी " मिळण्यासाठी कर्मचारी/कामगारास आर्थिक योगदान द्यावे लागत नाही. त्याने पूर्ण केलेल्या सेवाकालापोटी दरवर्षाला किमान १५ दिवसाचा सरासरी पगार ह्या हिशोबाने ग्रॅच्युईटी जमा होत जाते.ग्रॅच्युईटीची रक्कम आधिक दरानेही दिली जाऊ शकते.नोकरदाराने एका मालकाकडील नोकरी मध्येच सोडली तरी त्यास जमा झालेली ग्रॅच्युईटीची रक्कमही मिळते.मात्र त्या मालकाकडे किमान पाच वर्षाचा सेवाकाळ पूर्ण झालेला पाहिजे.

कर्मचारी/कामगाराचे सेवाकाळात अकाली निधन झाल्यास(अशावेळी पाच वर्षे सेवाकाळाची अट लागू होत नाही)किंवा सेवा निवृत्तीच्या वेळी ग्रॅच्युईटीची किती रक्कम आपल्या पदरात पडणार याविषयी नोकरदार वर्ग अत्यंत संवेदनशील बनतो. आजच्या स्पर्धेच्या युगात आपल्याकडील प्रशिक्षित, सक्षम व निष्ठावान नोकरवर्ग टिकवून ठेवण्यासाठी ग्रॅच्युईटी देण्यासंबंधी उद्योग/संस्थाच्या व्यवस्थापनास गांभीयनि विचार करावा लागतो.

### १९७२च्या ग्रॅच्युईटी कायद्यानुसार ग्रॅज्युईटी योजना :

साधारणत: १० पेक्षा अधिक नोकरांना कामावर ठेवणाऱ्या सर्व उद्योगांना/संस्थाना/बॅंकाना/कारखान्याना १९७२ चा ग्रॅच्युईटी भुगतान कायदा लागू होतो. या ग्रॅच्युईटी कायद्यानुसार अशा सर्व उद्योग/संस्थानी त्याच्या कामगारांना/कर्मच्याऱ्याना ग्रॅच्युईटी देणे बंधनकारक आहे. ज्यादिवशी कर्मचारी/कामगाराचा मृत्यू किंवा निवृत्ती मुळे राजीनाम्यामुळे सेवा संपुष्टांत येईल तेव्हा ही ग्रॅच्युईटीची रक्कम द्यावी लागते.

१९७२ च्या ग्रॅच्युईटी कायद्यानुसार प्रत्येक कर्मचारी/कामगारांना त्याने पूर्ण केलेल्या सेवाकाळाच्या प्रत्येक वर्षापोटी १५ दिवसाच्या सरासरी पगाराइतकी ग्रॅज्युईटी रक्कम लागू होते. ग्रॅच्युईटीची जास्तीत जास्त मर्यादा रु. ३,५०,००० इतकी आहे. ग्रॅच्युईटीची रक्कम कर्मचारी / कामगारांची सेवा संपुष्टात होण्याच्या तारखेस देय होते. त्याची सेवा पाच वर्षापेक्षा कमी असल्यास त्यास ग्रॅच्युईटी दिली जात नाही. परंतु त्याचा अकाली मृत्यू ओढवल्यास ग्रॅच्युईटी देण्यासाठी पाच वर्ष सेवा पूर्ण होण्याची अट लागू होत नाही.

10,00,000/-

### ग्रॅच्युईटी देण्याचे तीन मार्ग :

१९७२ च्या ग्रॅच्युईटी कायद्यानुसार बंधनकारक ठरणारी ग्रॅच्युईटीची रक्कम तीन मार्गापैकी कुठल्याही एकप्रकारे दिली जाऊ शकते. ग्रॅच्युईटी देण्याचे तीन मार्ग पुढीलप्रमाणे आहेत.

**जेव्हा येईल तेव्हा पाहू :**

जेव्हा कर्मचारी/कामगाराची सेवा संपुष्टात येईल किंवा त्याचा मृत्यु होईल तेव्हा देय झालेली ग्रॅच्युईटी रक्कम उद्योग / संस्थेच्या चालू खात्यातून देणे :

या मार्गाने ग्रॅच्युईटी दिल्यास त्या सर्व ग्रॅच्युईटीच्या रकमेचा भार त्या त्या आर्थिक वर्षातील उत्पन्नावर पडतो. या प्रकारात कोणत्या वर्षी किती कर्मचारी/कामगारांना ग्रॅच्युईटीची किती रक्कम द्यावी लागेल हे अगोदर नश्चित करता येत नाही. कारण कोणते कर्मचारी/कामगार मृत्यू पावणार किंवा मध्येच नोकरी सोडून जाणार हे निश्चित माहिती नसते एखाद्या वर्षीच्या उत्पन्नावर ग्रॅच्युईटीच्या रकमेचा अधिक बोजा वाढल्यास त्या वर्षातील नफा प्राप्तीवर विपरित परिणाम होऊ शकतो. परिणामी अशा उद्योग संस्थांचे मार्केटमधील स्थान डलमळीत होउ शकते.

ग्रॅच्युईटीची रक्कम पूर्ण केलेल्या सेवाकाळावर ठरत असते. म्हणजेच मागील काळात पूर्ण केलेल्या सेवाकाळासाठी द्यावी लागणारी रक्कम चालू वर्षातील उत्पन्नातून द्यावी लागते. आंतरराष्ट्रीय अकौंटीग स्टडर्सनुसार उद्योग/व्यापारी संस्थाच्या खात्यावर ज्या वर्षीची आर्थिक जबाबदारी त्याच वर्षीच्या उत्पन्नावर पडली पाहिजे, असा संकेत आहे. ह्या संकेतानुसार दरवर्षी ग्रॅच्युईटीच्या रकमेपोटी अंदाजे आर्थिक तरतुद करण्याचा मार्ग उपलब्ध असतो. (तरीही अशी दरवर्षी केली जाणारी आर्थिक तरतुद एखाद्या वर्षी खुप कमी ठरु शकते. कारण कोणत्या वर्षी किती ग्रॅच्युईटी रक्कम द्यावी लागणार हे सांगता येत नाही.)

शिवाय दरवर्षी ग्रॅच्युईटीपोटी विशिष्ट रकमेची तरतुद केल्यास त्या रकमेची इतरत्र गुंतवणूकही करता येत नाही.

परिणामी कधी-कधी उद्योग/संस्थेच्या खात्यातील ग्रॅच्युईटीची रक्कम अनुत्पादक ठरते. ग्रॅच्युईटी देण्याचा हा मार्ग निवडल्यास यशापयशाची जबाबदारी सर्वस्वी व्यवस्थापनावरच येऊन पडते.

**वेगळ्या ट्रस्टव्दारे ग्रॅच्युईटी रकमेचे व्यवस्थापन :**

वरील प्रकारे ग्रॅच्युईटी रक्कम देण्याची जबाबदारी पार पाडावयाची नसल्यास एक स्वतंत्र ट्रस्ट निर्माण करुन त्याव्दारे ग्रॅच्युईटी रकमेचे व्यवस्थापन केले जावू शकते.

ग्रॅच्युईटी देण्याचा हा मार्ग स्वीकारायचा झाल्यास त्या उद्योग /संस्थेने केवळ ग्रॅच्युईटी देण्याचेच उद्दिष्ट असलेले एक स्वतंत्र ट्रस्ट निर्माण करावे लागते. असे स्वतंत्र ट्रस्ट निर्माण केल्यानंतर त्या ट्रस्टच्या नावे एक स्वतंत्र खाते सुरु करावे लागते. स्वतंत्र ट्रस्टच्या खात्यावर दरवर्षी/संस्थेच्या नफ्यातून ग्रॅच्युईटी पोटी विशिष्ट प्रमाणात रक्कम वर्ग करावी लागते.

ग्रॅच्युईटी देण्याच्या ह्या **मार्गाचा अवलंब केल्यास :**

१. स्वतंत्र ट्रस्ट निर्माण करण्याची सर्वस्वी जबाबदारी व्यवस्थापनावर येते.
२. स्वतंत्र ट्रस्ट निर्माण करण्यासाठी आवश्यक ती सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करावी लागते.
३. स्वतंत्र ट्रस्टच्या स्वतंत्र खात्याव्दारे आर्थिक तथा अन्य व्यवहार पार पाडण्यासाठी व्यवस्थापनातील

महत्वाच्या व्यक्तीनाच अडकुन पडावे लागते.

४. ग्रॅच्युईटीची रक्कम पूर्वनिश्चित करता येत नसल्यामुळे दरवर्षी ट्रस्टच्या खात्यात जमा होणाऱ्या रकमेची प्रभावी व लाभदायकरित्या गुंतवणुक करावी लागते.

५. ट्रस्टच्या खात्यावरील रकमेची गुंतवणुक जेव्हा लागेल तेव्हा ग्रॅच्युईटी देण्यासाठी उपलब्ध होणे जरुरी ठरते तसेच या रकमेची गुंतवणुक आयकर कायद्यातील तरतुदीनुसार करावी लागते.

६. ट्रस्टने गुंतवलेल्या रकमेची गरज पडेल तेव्हा सहज उपलब्धता(Liquidity)आणि गुंतवणुकीवर मिळणारे व्याज यामध्ये योग्य संतुलन राखण्याची जबाबदारी व्यवस्थापनाचीच असते.

थोडक्यात, म्हणजे, स्वतंत्र ट्रस्ट व्दारे गरज पडेल तेव्हा ग्रॅच्युईटीची रक्कम देणे ही सर्वस्वी वरिष्ठ व्यवस्थापनाचीच डोकेदुखी होऊन बसते. अशा परिस्थितीत उद्योग/संस्थेच्या भरभराटीच्या आणि व्यस्थापनाच्या सोयीच्या दृष्टीने अन्य तिसऱ्या मार्गाचा शोध घेणे अनिर्वाय ठरते.

**एल.आय.सी.समूह विभाग योजनेव्दारे ग्रॅच्युईटी लागू करण्याचा सर्वोत्तम मार्ग :**

वरील दोन्ही मार्गांनी ग्रॅच्युईटी देण्याऐवजी भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या समूह विमा योजनेव्दारे ग्रॅच्युईटी लागू करण्याचाच मार्ग सर्वात्तम होय. १९७२ च्या ग्रॅच्युईटी भुगतान कायद्यातील तरतुदीनुसार आयुर्विमा महामंडळाच्या समूह विमा योजनेव्दारे ही ग्रॅच्युईटी दिली जाते. ह्या मार्गाचा अवलंब केल्यास उद्योग/संस्थेचे व्यवस्थापन एका मोठ्या जबाबदारीतून मुक्त होऊ शकते.

**आयुर्विमा महामंडळाची ग्रॅच्युईटीसह समूह विमा योजना -ठळक वैशिष्टये :**

आयुर्विमा महामंडळाची ग्रॅच्युईटीसह समूह विमा योजना अत्यंत लाभदायी तथा वैशिष्टयपूर्ण आहे. ह्या योजनेत व्यवस्थापनाबरोबरच कर्मचारी/कामगारांचे ही समाधान दडलेले आहे. एकाच वेळी उद्योग/संस्थेचे व्यवस्थापन आणि कर्मचारी /कामगारांना अधिक लाभ देऊन खुश करणारी अशी ही अनोखी ग्रॅच्युईटी योजना आहे. या योजनेची काही ठळक वैशिष्टय पुढीलप्रमाणे आहेत.

१. या योजनेत पूर्ण झालेल्या सेवाकाळासाठी ग्रॅच्युईटी रक्कम तर मिळतेच. शिवाय कर्मचारी/कामगारांचा अकाली मृत्यु ओढवल्यास त्याच्या कायदेशीर वारसाला त्याने पूर्ण न केलेला भविष्यातील पूर्ण सेवाकाळ गृहीत धरुन विमा संरक्षणाची रक्कमही मिळते.

२. कर्मचारी/कामगाराचा मासिक पगार (बेसिक व डी.ए. मिळुन) व त्याने पूर्ण केलेल्या सेवा काळासाठी व्यवस्थापनास ठरविलेल्या दराने ग्रॅच्युईटीची रक्कम जमा होत जाते.

त्याच दराने भविष्यात बाकी असलेल्या सेवाकाळासाठी विमा संरक्षण लागू करुन पूर्ण सेवाकाळासाठी ग्रॅच्युईटीची रक्कम सुरक्षित केली जाते. विमा संरक्षणासाठी वेगळा विमा हप्ता भरावा लागतो.

४. ही योजना लागू करताना विमा विभागाकडुन आजपर्यंत पूर्ण झालेल्या एकूण सेवेकाळासाठी आजच्या एकूण पगारानूसार साचलेली परंतू देय नसणारी रक्कम निश्चित केली जाते. भुतकाळातील या साचलेल्या ग्रॅच्युईटीपोटी मागील अनुभवावरुन ठराविक प्रमाणात इनिशियल कॉन्ट्रीब्युशन म्हणून एक रक्कम घेतली जाते. ही रक्कम नियमित भराव्या लागणाऱ्या वार्षिक विमा हप्त्याशिवाय असते. इनिशियल कॉट्रीब्युशनची रक्कम सुरूवातीच्या पाच वर्षात विभागूनही भरता येते.

५. ग्रॅच्युईटीसह समूह विमा योजनेअंतर्गत एक निधी संकलित करण्यात येतो. विमा संरक्षणापोटी द्यावा लागणारा विमा हप्ता वगळता सर्व रक्कम दरवर्षी ह्या निधीतच वर्ग केली जाते. दरवर्षी या संकलित निधीवर आकर्षक व्याज देण्यात येते. अशाप्रकारे दरवर्षी लागू होणारे व्याज आणि दरवर्षी जमा होणारी रक्कम यामुळे हा ग्रॅच्युईटी निधी वाढत जातो. त्यास कॅश ॲक्युम्युलेशन म्हणतात. त्यावरुनच आयुर्विमा महामंडळाच्या योजनेस ग्रुप ग्रॅच्युईटी कॅश ॲक्युम्युलेशन योजना असे म्हटले जाते.

६. या ग्रॅच्युईटी निधीची गुंतवणुक आयकर कायद्यातील तरतुदीनुसार केली जाते. या निधीच्या गुंतवणुकीवर मिळणाऱ्या व्याजाच्या रकमेवर उद्योगास आयकर भरावा लागत नाही.

७. ह्या योजनेच्या नावानेच एक स्वतंत्र इररिव्होकेबल(रद्द न करता येणारे) ट्रस्ट उद्योग/संस्थेच्या व्यवस्थापनास स्थापन करावे लागते. या योजनेचे सर्व व्यवहार या ट्रस्ट मार्फतच करावे लागतात.

८. या योजनेअंतर्गत एखादा उद्योग/संस्था वा कारखान्यांतील कर्मचारी/कामगारांना ग्रॅच्युईटी देण्याची जबाबदारी आयुर्विमा महामंडळ घेत असेल तरी आयुर्विमा महामंडळाची जबाबदारी त्या ग्रॅच्युईटी योजनेच्या संकलित झालेल्या निधी पुरतीच असते. ग्रॅच्युईटी योजनेच्या संकलित निधीच्या प्रमाणातच आयुर्विमा महामंडळाकडुन ग्रॅच्युईटींची रक्कम क्लेम व्दारे दिली जाते.

९. आयुर्विमा महामंडळाकडुन ग्रॅच्युईटी निधी तयार करताना दरवर्षी किती कर्मचारी/कामगारांना ग्रॅच्युईटी द्यावी लागणार या विषयी मागील अनुभवांवरुन एक अंदाज बांधला जातो. त्यानुसार मागील काळात साचलेल्या ग्रॅच्युईटी पोटी काही प्रमाणातच (पुर्ण नव्हे) रक्कम घेतलेली असते. मध्ये-मध्ये एखाद्याच वर्षी अनेक सभासदांना कर्मचारी/कामगारांना प्रमाणाबाहेर ग्रॅच्युईटी दयावी लागल्यास आयुर्विमा महामंडळाकडील ग्रॅच्युईटीसाठी संकलित झालेला निधी कमी पडू शकतो. अशावेळी त्या ग्रॅच्युईटीच्या ट्रस्टने व्यवस्थापनाकडुन उर्वरित ग्रॅच्युईटी रकमेची भरपाई करावी लागते.

१०. आयुर्विमा महामंडळाच्या ग्रॅच्युईटी रकमेचे मुल्य वैशिष्ट्य म्हणजे पूर्ण न कलेलेल्या भविष्य काळातील महामंडळाची ग्रॅच्युईटी (फ्युचर सर्व्हिस ग्रॅच्युईटी) पोटी लागू केले जाणारे विमा संरक्षण होय. भविष्यकाळातील ग्रॅच्युईटी पोटी लागु होणाऱ्या विमा संरक्षणासह उद्योग/संस्थेच्या व्यवस्थापनाची ग्रॅच्युईटी फंड (निधी) मॅनेज करण्याची

११. ट्रस्ट डीड, ट्रस्ट रुल्स इ. दस्तावेज तयार करणे. अशा कायदेशीर परंतु किचकट बाबतीत आयुर्विमा महामंडळ मदत करते.

१२. ग्रॅच्युईटी लायबिलीटीचे ॲक्युरिअल व्हॅल्युएशन आयुर्विमा महामंडळ करुन देते.

**ग्रॅच्युईटीसह समूह विमा योजना- लागू करण्याची प्रक्रिया :**

१. उद्योग/संस्थेच्या व्यवस्थापनाने आयुर्विमा महामंडळाच्या समूह विमा विभागांत संपर्क साधावा.

२. ग्रॅच्युईटीसह समूह विमा योजनेची सविस्तर माहिती करुन घ्यावी.

३. आपल्या उद्योग/संस्थेतील सर्व कर्मचारी कामगारांचे पूर्ण नांव,जन्मतारीख, नेमणूकीची तारीख, मासिक पगार
(बेसिक व डी. ए. मिळून) हुद्दा / श्रेणी, योजना लागू करण्याची तारीख इ. माहितीसह यादी संगणक

सी.डी./फ्लॉपी किंवा लिखित स्वरुपात सादर करावी.
कर्मचारी/कामगारांच्या यादीबरोबरच सेवानिवृत्तीचे वय, ग्रॅच्युईटी लागू करण्याचा दर(ग्रॅच्युईटी कायद्यातील
४. तरतुदीनुसार किंवा त्यापेक्षा अधिक) याविषयीची माहितीही लिखित रुपात द्यावी.
कर्मचारी / कामगारांची पूर्ण विवरणासह यादी प्राप्त झाल्यानंतर विमा हप्ता ठरविला जातो. तो विमा हप्ता
माहित करुन घ्यावा.
५. विमा हप्त्याबरोबरच कर्मचारी/कामगारांच्या आजपर्यंतच्या एकूण सेवाकाळासाठी जी ग्रॅच्युईटीची रक्कम देय झालेली
(साचलेली) असते त्यापोटी काही प्रमाणात आवश्यकतेनुसार सुरुवातीस अधिक रक्कम भरावी लागते. योजनेच्या
६. सुरुवातीस द्यावे लागणारे हे जास्तीचे योगदान सुरुवातीच्या पाच वर्षात विभागुन भरता येते. ही रक्कमही
माहीत करुन घ्यावी.सुरुवातीस भरावयाची रक्कम आणि चालू वर्षीचा विमा हप्ता माहित करुन घेतल्यानंतर व्यवस्थापनाने
ग्रॅच्युईटीसह समूह विमा योजना लागू करण्याचा निर्णय करावा.
आयुर्विमा महामंडळाची ही ग्रॅच्युईटी योजना लागू करण्यासाठी उद्योग/संस्थेच्या वरिष्ठ व्यवस्थापनाने एक स्वतंत्र
७. इररिव्होकेबल(रद्द न करता येणारे) ट्रस्ट स्थापन करावे.
आयुर्विमा महामंडळाची ही ग्रॅच्युईटी योजना लागू करण्याचा करार इररिव्होकेबल ट्रस्ट आणि समूह विमा विभाग
यामध्ये केला जातो. त्यामुळे ग्रॅच्युईटीसह समूह योजनेची पुढील सर्व कार्यवाही / व्यवहार ह्या ट्रस्टच्या मार्फतच
केले जाते.
८. आयुर्विमा महामंडळाची ग्रॅच्युईटीसह समूह विमा योजना लागू करण्याचा निर्णय झाल्यानंतर स्थापन केलेल्याइररिव्होकेबल
ट्रस्टच्या ट्रस्टडीडची प्रमाणित प्रत जोडून त्याबद्दलची माहिती आयकर विभागास कळवावी.
९. सर्व कागदपत्रे, विमा हप्ता व सुरुवातीचे आर्थिक योगदान प्राप्त झाल्यानंतर ग्रॅच्युईटीसह समूह विमा योजना लागू
करण्याची पुढील कार्यवाही पूर्ण करुन ट्रस्टींच्या नामे एक मास्टर पॉलीसी तयार करुन पाठविली जाते.

कृपया आपणांस विनंती की, आपल्या संस्थेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सदर कल्याणकारी योजनेची माहिती द्यावी.
पुढीलप्रमाणे माहिती संस्थेच्या लेटरहेडवर पाठविल्यास सर्व सदस्याचा हप्ता आपणांस कळविता येईल.

| क्रमांक | संपूर्ण नांव | हुद्दा | जन्म दिनांक किंवा वय | नोकरीचा रुजू दिनांक |
|---|---|---|---|---|
| | | | | |

अधिक माहितीसाठी - E-mail-bo_g708@licindia.com वर किंवा प्रत्यक्ष किंवा दुरध्वनीद्वारे संपर्क साधावा ही विनंती. कळावे.

आजची गरज, संघटित समाज, संघटित संरक्षण
LIC ग्रुप इन्शुरन्स म्हणजे.... कमीत कमी दरात, जास्तीत जास्त विमा संरक्षण !

आपला विश्वासू ,

श्री. दिपक कुलकर्णी
शाखाधिकारी (समूह विमा)
मो. 9850289612

श्री. पी. आर. बिवलकर
शाखाधिकारी (समूह विमा)
मो. 9422693300

(टिप : वरील भाषांतर हा मुळ परिपत्रकाचा स्वैर अनुवाद आहे )

# INDUSTRIES NASHIK/AMBAD

1. Graphite India Ltd.
2. Atlas Copco (India) Ltd.
3. Perfect Circle Victor Ltd.
4. BCL Forgings Ltd.
5. Business Combine Ltd.
6. Hindustan Hardy Spicer Ltd.
7. Taparia Tools Ltd.
8. Trambak Rubber Industries Ltd.
9. Jyoti Paper Vdyog.
10. Garware Industries Ltd.
11. Fem Care Pharma Ltd.
12. Mahindra Sona Ltd.
13. Fiber Foam (BOmbay) Pvt. Ltd.
14 Asian Electronics Ltd.
15. EPC Industries Ltd.
16. Ashoka Buildcon Ltd.
17. Unique Industrial Handlers Ltd.
18. Kimplus Piping Systems Ltd.
19. Hindustan Coca Cola Beverages.
20. R.M. Chemicals Pvt. Ltd.
21. Rishabh Instruments Pvt. Ltd.
22. Keystone appliances Satpur.
23. Art Rubber Industries Ltd.
24. Reliable Autotech Pvt.Ltd.
25. Innova Rubber Pvt. Ltd.
26. Arrow Webtex Ltd.
27. Klassic Food (P.) Ltd.
28. Ashoka Education Foundation.

भारतीय आयुर्विमा महामंडळ
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

# भारतीय जीवन बीमा निगम

पेन्शन व समूह योजना विभाग,नाशिक विभागीय कार्यालय, नाशिक.

'जीवन प्रकाश' पी.ॲन्ड जी.एस. विभाग, गोल्फ क्लब ग्राऊंड, गडकरी चौक, नाशिक-२.

फोन नं.२५७३५२०,२५८१९६२फॅक्स : २५७८०६७ E-mail : bo_g708@licindia.com

प्रति,
प्राचार्य / व्यवस्थापक

______________________________

______________________________

## एल. आय. सी. नाशिक समूह विमा

## ग्रुप ग्रॅच्युईटी योजना कार्यान्वित केलेल्या उल्लेखनिय काही सहकारी संस्था, सहकारी बँका व पतसंस्था.

### नाशिक जिल्हा

१. नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक
२. विश्वास को. ऑप. बँक
३. ना.रोड देवळाली व्यापारी बँक
४. नाशिक पिंपल्स को. ऑप. बँक
५. नाशिक जि. महिला सह. बँक
६. मराठा विद्या प्रसारक सह. बँक
७. जनलक्ष्मी को-ऑप.बँक, नाशिक
८. गोदावरी को-ऑप.बँक, नाशिक
९. श्री समर्थ सहकारी बँक, नाशिक
१०. राजलक्ष्मी अर्बन सह.बँक, नाशिक
११. बिझीनेस को ऑप.बँक, ना.रोड
१२. मालेगांव मर्चन्टस को-ऑप.बँक
१३. वणी मर्चन्टस को-ऑप.बँक
१४. श्री सिन्नर व्यापारी को-ऑप.बँक
१५. सटाणा मर्चन्टस को-ऑप.बँक
१६. कळवण मर्चन्टस को-ऑप.बँक
१७. पिंपळगांव मर्चन्टस को-ऑप.बँक
१८. निफाड अर्बन को-ऑप. बँक,
१९. घोटी मर्चन्टस को-ऑप.बँक
२०. जनता सह. बँक, लासलगाव
२१. नाशिक को-ऑप.क्रे.कॅपिटल लि.
२२. चांदवड मर्चंट को-ऑप. बँक
२३. सिन्नर नागरी सह. पतसंस्थ
२४. श्री सिध्दी विनायक पतसंस्था, ओझर
२५. भैरवनाथ पतसंस्था, सिन्नर

### जळगाव जिल्हा

१. जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक
२. जळगाव पिपल्स को. ऑप. बँक
३. प्रतिभा महिला सहकारी बँक,जळगाव
४. दि अमळनेर को.ऑप.अर्बन बँक
५. दि पाचोरा पिपल्स् को-ऑप. बँक
६. दि नागरीक सह.बँक, एरंडोल
७. दि चोपडा पिपल्स् को-ऑप.बँक,
८. दि जळगाव जनता सहकारी बँक,
९. दि रावेर पिपल्स् को-ऑप. बँक
१०. एस. के. नहाटा अर्बन को-ऑप बँक
११. महात्माफुले को-ऑप.क्रे सोसायटी,वरणगाव
१२. सावदा फैजपूर सह.पतसंस्था
१३. श्री महावीर सह.पतसंस्था, जळगाव
१४. श्री मर्चंट नागरी सह.पतसंस्था पारोळा

### धुळे जिल्हा

१. धुळे जिल्हा सरकारी नोकरांची बँक
२. शिरपुर मर्चन्टस को-ऑप. बँक
३. धुळे मर्चन्टस को-ऑप. बँक
४. राजवाडे मंडळ पिलल्स बँक
५. हस्ती को-ऑप. बँक, दोंडाईचा
६. दादासाहेब रावळ को-ऑप. बँक,दोंडाईचा
७. धुळे अर्बन को-ऑप. बँक
८. धुळे पिपल्स को-ऑप.
९. इंदिरा सह. बँक धुळे
१०.प्रियदर्शनी पतसंस्था, शिरपुर

### कृषी उत्पन्न बाजार समिती

नाशिक/ दिडोरी / घोटी / पिंपळगाव / चांदवड / कळवण / लासलगाव / सिन्नर / मनमाड / नांदगाव / येवला / चोपडा / चाळीसगाव / शहादा / दोंडाईचा

भारतीय आयुर्विमा महामंडळ
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

# भारतीय आयुर्विमा महामंडळ

'समुह विमा विभाग, नाशिक विभागीय कार्यालय, ''जीवन प्रकाश'' गोल्फ क्लब मैदान, नाशिक.
फोन : २५७३५२०, २५८१९६२ फॅक्स : २५७८०६७. E-mail : bo_g708@licindia.com



प्रती,
____________________
____________________
____________________

# ग्रुप ग्रॅच्युईटी योजना
## (मालकांकरिता आकर्षक व कर्मचाऱ्यांच्या हिताची)

### ग्रॅच्युईटी म्हणजे काय ?

सन १९७२ च्या पेमेंट ऑफ ग्रॅच्युईटी कायद्यानुसार (किमान १० कर्मचारी असणाऱ्या आस्थापनेला लागू) पाच किंवा जास्त वर्षे नोकरी झालेल्या कर्मचाऱ्यास त्याच्या सेवानिवृत्तीस वा त्याने अगोदर नोकरी सोडल्यास ग्रॅच्युईटी देत होते. अकाली मृत्यू वा अपघात, आजाराने अपंगत्व आल्यास किमान नोकरीची अट नाही. नोकरीच्या प्रत्येक पूर्ण वर्षासाठी मासिक पगाराचा १५ / २६ भाग या दराने ही रक्कम काढली जाते. कमाल मर्यादा रू. ३,५०,०००/- आहे.
१०,००,०००=००

### मालकाची वाढती जबाबदारी

होय. ग्रॅच्युईटीची रक्कम कर्मचाऱ्यांची एकूण नोकरी व शेवटचा पगार यावर अवलंबून असते. त्यामुळे नोकरीच्या प्रत्येक वर्षाबरोबर व प्रत्येक पगारवाढी बरोबर ही जबाबदारी वाढत रहाते. त्यामुळेच या जबाबदारीचे सुयोग्य आर्थिक तत्वानुसार.नियोजन करणे आवश्यक आहे.

### आयुवर्विमा महामंडलाची योजना

प्रत्येक कर्मचाऱ्याची वैयक्तिक माहिती व त्या समूहासंदर्भात आलेल्या व येऊ शकणाऱ्या अनुभवार आधारित बाबींचा विचार करून ग्रॅच्युईटीची जबाबदारी ठरविली जाते. या योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे.

१. योजना सुरू होतेवेळी नोकरीच्या मागील वर्षाच्या ग्रॅच्युईटीची रक्कम एकरकमी या जास्तीत जास्त पाच वार्षिक हप्त्यात भरता येते.
२. दरवर्षी वाढत जाणाऱ्या ग्रॅच्युईटीच्या जबाबदारीसाठी वार्षिक पगारबिलाच्या ठराविक टक्के असा वार्षिक हप्ता घेतला जातो.
३. मालकांनी भरलेल्या हप्त्यांवर आकर्षक व्याज दिले जाते. सध्या हा दर किमा ८.७०% आहे.
(जास्तीत जास्त ९.३०% ग्रॅच्युईटी फंडच्या जमा रक्कमेप्रमाणे)
४. गॅच्युटीची रक्कम कर्मचाऱ्यांना विश्वस्तांमार्फत दिली जाते.
५. सुयोग्य, सुरक्षित व लाभदायी गुंतवणूक कशी करायची या चिंतेतून मालकांची मुक्तता.

### कर्मचाऱ्याच्या अकाली मृत्युनंतर मिळणारे वाढीव फायदे

मृत्यूसारख्या अनिश्चित घटनेनंतर पुरेसे फायदे मिळू शकणार असतील तर कर्मचाऱ्यांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होऊन त्यांची उत्पादन क्षमता वाढते. परंतू ग्रॅच्युईटी ही मृत्यूदिनांकापर्यंत झालेल्या नोकरीच्या काळापुरतीच असते. आयुर्विमा महामंडळाच्या ग्रॅच्युईटी योजनेनुसार निवृत्तीपर्यंतच्या पूर्ण कालखंडाची ग्रॅच्युईटी देण्यात येते.

उदा. श्री. अबक

| | | |
|---|---|---|
| शेवटचा पगार : रू. २०००/- | मृत्युसमयी झालेली नोकरीची वर्षे : ४ वर्षे | निवृत्तीपर्यंतची नोकरीची राहीलेली वर्षे : ३६ वर्षे |
| कायद्यानुसार देय ग्रॅच्युईटी : | | ४ X १५ / २६ X २००० = रू. ४६१५/- (अ) |
| आयुर्विमा महामंडळाच्या योजनेतून दिली जाणारी वाढीव ग्रॅच्युईटी : | | ३६ X १५/२६ X २०००= रू.४१,५३९/- (ब) |
| | एकूण मिळणारी रक्कम : | रू. ४६,१५४/- (अ+ब) |

### करसवलत मिळते का ?

होय, वार्षिक पगाराच्या ८.३३% पर्यंत भरलेल्या वार्षिक हप्त्यावर मालकाला आयकरातून सूट मिळू शकते.

### योजना कशी सुरु करायची ?

१) कर्मचाऱ्याचे नांव, हुद्दा, जन्म तारीख, नोकरीस लागल्याची तारीख व मागील महिन्याचा पगार (मुळ वेतन व म. भत्ता) हा तपशील द्यावा. तसेच मागील तीन वर्षातील कर्मचारी वर्गातील नवीन नेमणूक/निवृत्ती/मृत्यु/राजीनामा इत्यादी बदल कळवावेत.
२) किमान २ जणांचा ट्रस्ट करून रू. २००/- च्या नॉन ज्युडीशियल स्टॅम्प पेपरवर ट्रस्ट डीड करावे. या कामी आम्ही आपणास मदत करू.
३) ट्रस्ट डिड व नियमांच्या २ प्रती आयकर आयुक्तांकडे पाठवाव्यात. अर्जावर रू.५ चा कोर्ट फी स्टॅम्प लावावयाचा असो.
४) ट्रस्टच्या नावे बँकेत खाते उघडावे.

अधिक तपशिलासाठी कृपया पुढील पत्त्यावर अवश्य संपर्क साधावा.

आपले,

राजेंद्र पवार
शाखाधिकारी (समूह विमा)
मो. ९८५०५०२३०२

शांताराम काळे
शाखाधिकारी (समूह विमा)
मो. ९८२२२५४७०८

(टिप : वरील भाषांतर हा मुळ परिपत्रकाचा स्वैर अनुवाद आहे. केवळ खासगी वितरणासाठी)